

# मुकुल माधव विद्यालयाचे यश

**पुणे** - राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेत मुकुल माधव विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. दहावीची परीक्षा देणारी विद्यालयाची ही पहिलीच तुकडी होती. एकूण २६ विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये उत्तम यश संपादन केले. २६ पैकी १९ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त करून विशेष श्रेणी प्राप्त केली. उर्वरित सात विद्यार्थ्यांना ६४ ते ७३ टक्के यादरम्यान गुण प्राप्त झाले. पहिल्याच वर्षी शाळेचा शंभर टक्के निकाल लागला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापक विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांनी अभिनंदन केले.